**"मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत मुरमाड क्षेत्रात शेततळे हे पुनर्भरण उपचार म्हणून घेण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
शासन परिपत्रक क्रमांक : शेततळे-२०१८/प्र. क्र. ३८/रोहयो-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई –४०० ०३२,
दिनांक :- २६ नोव्हेंबर, २०१८.

**वाचा :-** १) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : शेततळे-२०१६/प्र. क्र. १(७४)/रोहयो-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६.
२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : शेततळे-२०१६/प्र. क्र. १(७४)/रोहयो-५, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६.
३) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे यांचे पत्र जा.क्र. मृदसं/शेततळे/२/८७/२०१८, दिनांक २१.२.२०१८.

**परिपत्रक**

विभागाच्या वाचा येथे अ.क्र. १ येथे नमूद दिनांक १७.२.२०१६ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २.३.२ मध्ये **"मुरमाड, वालुकामय, सच्छिद्र खडक अशी जमीन असलेली जागा शेततळयास निवडू नये"** अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि योजनेची अंमलबजावणी करताना क्षेत्रिय स्तरावर शेततळे खोदताना मातीबरोबर मुरमाड भूस्तर आढळून आलेला आहे. यामुळे अशाठिकाणी घेतलेल्या शेततळयात साठविलेलेल पाणी भूगर्भात पुनर्भरण होत असल्याने जिल्हाधिकारी अमरावती यांनी "पुनर्भरण उपचार" म्हणून मुरमाड व खडकाळ जमिनीत शेततळे घेण्याचा प्रस्ताव संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे यांना सादर केला होता. त्यास अनुसरुन संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक २१.२.२०१८ च्या पत्रान्वये विभागास प्रस्ताव सादर केला आहे.

२. तद्नुसार "मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत दिनांक १७.२.२०१६ च्या शासन निर्णयातील शेततळयाची जागा निवडीचे तांत्रिक निकषामधील मुद्दा क्रमांक २.३.२ मध्ये **"मुरमाड, वालुकामय, सच्छिद्र खडक अशी जमीन असलेली जागा शेततळयास निवडू नये"**, असे नमूद आहे. तथापि आता या अटीमध्ये



Scanned by CamScanner

सुधारणा करुन **मुरमाड क्षेत्रात शेततळे हे "पुनर्भरण उपचार" म्हणून करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.**

३. यान्व्यतिरिक्त दिनांक १७.२.२०१६ व दिनांक १०.१०.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी सदर क्षेत्रांतील लाभार्थ्यांना लागू राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

(डॉ. प्रमोद शिंदे)
उप सचिव (रोहयो)

प्रती,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव.
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे.
११. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे.
१२. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
१३. संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रण, पुणे.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१६. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१७. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर)
१८. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई / महासंचाललक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीपत्रक)
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
२०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२१. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२३. सर्व उपयिच/अवर सचिव/कक्ष अधिकारी (रोहयो)
२४. निवडनस्ती (रोहयो-५)



Scanned by CamScanner